मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भोसरीमध्ये महाविकास आघाडीकडून अजित गव्हाणे यांना उमेदवारी

## भाजपसमोर तगडे आव्हान : नागरिक परिवर्तनाच्या मनस्थितीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अजित गव्हाणे यांना उमेदवारी दिल्यामुळे भोसरीमध्ये महाविकास आघाडीने भाजप समोर तगडे आव्हान उभे केले असल्याचे मत राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत. भाजपला एकतर्फी वाटणारी भोसरी मतदारसंघाची निवडणूक गव्हाणे यांच्या माध्यमातून ' रेस ' मध्ये आली आहे. दहा वर्षातील भ्रष्टाचार, नागरिकांमधील नाराजी , स्वकीयांचा अंतर्गत विरोध यामुळे भाजपला ही निवडणूक



सोपी नाही असे चित्र भोसरी मतदारसंघात पाहायला मिळत आहे.

भोसरी विधानसभा मतदारसंघावर गेली दहा वर्षे आमदार भाजपचे महेश लांडगे कार्यरत आहे. आमदार लांडगे तिसऱ्यांदा निवडणुकीला सामोरे जात असले असले, तरी महाविकास आघाडीने त्यांच्यासमोर तगडे आव्हान उभे केले आहे. लांडगे यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असणाऱ्या गटाला बरोबर घेऊन महाविकास आघाडी निवडणुकीला सामोरी जात असून, अजित गव्हाणे यांनी या निवडणुकीला रंगत आणली आहे.

### भाजपा समोर तगडे आव्हान!

» आमदार महेश लांडगे 2014, 2019 असे सलग दोन वेळा निवडणुकीला सामोरे गेले. मात्र या दोन्ही वेळी त्यांच्यासमोर शिवसेनेच्या सुलभा उबाळे आणि अपक्ष उमेदवार विलास लांडे होते. आता पुन्हा भाजपने आमदार लांडगे यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, ही निवडणूक लांडगे यांच्यासाठी सोपी राहिलेली नाही. शहरातील तिन्ही मतदारसंघांच्या तुलनेत महाविकास आघाडीने भोसरी मतदारसंघावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील वेळोवेळी याबाबत आढावा घेत आहेत. त्यामुळे प्रचाराला दोन महिन्यांपासून सुरुवात करत अजित गव्हाणे यांनी भोसरी मतदारसंघ पिंजून काढला . आमदार लांडगे यांचे विरोधक आणि नाराज गटातील लोकांना एकत्र आणून त्यांनी आघाडी घेतली आहे. गेल्या दहा वर्षात भोसरी मतदारसंघात आलेला निधी, त्याचा वापर, विकासाच्या बाबत सेट केलेले खोटे दावे, रस्त्यांची स्थिती, खड्डे, पावसाळ्यात निर्माण झालेली विदारक स्थिती, गेल्या दहा वर्षात वेगवेगळ्या विषयांवर न झालेला पाठपुरावा अशा सर्व गोष्टींना गव्हाणे यांनी मतदारांच्या समोर ठेवले आहे. त्यामुळे लांडगे यांना सोप्पी वाटणारी निवडणूक गव्हाणे यांनी अटीतटीची करून ठेवली आहे.

# मोशीत दहावी परिक्षेच्या तयारीबाबत मार्गदर्शन

## येत्या काही दिवसांतच विद्यार्थी दहावी व बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

येत्या काही दिवसांतच विद्यार्थी दहावी व बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणार आहेत. परीक्षेचे वेळापत्रक, ठिकाण, विषयांचा तणाव विद्यार्थी व पालकांना असतो. यासाठीच सकाळ विद्या व मोशन अॅकॅडमीच्या वतीने 'दहावीच्या परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाचे आयोजन केले आहे. १० नोव्हेंबरला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. अ. ल. देशमुख मार्गदर्शन करणार आहेत.

मोशी येथील भारत माता चौकातील जय गणेश बॅंक्वेंट हॉल व लॉन्स येथे आयोजित केले आहे. दहावीच्या परिक्षेला सामोरे जाताना नेमकी काय तयारी केली पाहिजे, कशावर भर दिला पाहिजे, उत्तरपत्रिका नेटकेपणाने कशी लिहायची, वेळेत सर्व प्रश्नांची उत्तरे कशी लिहून काढायची? याची परिपूर्ण माहिती आणि करियरच्या दृष्टीने दहावीची परिक्षा हा सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो. त्यामुळे ही परिक्षा कशी द्यायची? अधिक गुण प्राप्त करण्यासाठी काय करावे? याचे परिपूर्ण मार्गदर्शन ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ अ. ल. देशमुख आणि मोशन अॅकॅडमीचे संचालक प्रा. जितेंद्र पवन करणार



आहेत.

यासोबतच दहावीनंतर करियरच्या संधी काय आहेत? उच्च शिक्षण कुठून व कोणत्या विषयात घ्यायचे? याबाबत शंकानिरसनही केले जाणार आहे. 'विज्ञान शाखेतील शिक्षण आणि करियरच्या संधी' याबाबत, तसेच अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेश अर्थात 'जेईई' आणि 'नीट' प्रवेश प्रक्रियेबाबतही सविस्तर माहिती दिली जाणार आहे. दहावीनंतर पुढे कोणते शिक्षण घ्यायचे? कोणती विद्या शाखा निवडायची? इंजिनिअरिंग की मेडिकलला जायचे? याबाबत शंका निरसन करण्यासाठी 'सकाळ विद्या' आणि मोशन अॅकॅडमी यांच्यातर्फे 'करिअर निवड' विषयावर तज्ज्ञ प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

काय? कधी? केव्हा? कुठे?
काय? दहावीनंतर करिअर निवड मार्गदर्शन
कधी? रविवार, १० नोव्हेंबर २०२४
केव्हा? सकाळी १० वाजता
कुठे? श्री गणेश बॅक्वेंट हॉल व लॉन्स, भारत माता चौक, मोशी
प्रवेश विद्यार्थी व पालकांसाठी विनामूल्य
संपर्क : ९७३०९५९६९९
सहभागासाठी संपर्क किंवा क्युआर कोड स्कॅन करा.

# नागेश्वर महाराजांची शपथ... मोशीचा एकोपा कायम ठेवणार!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा संवाद मेळावा, 10 वर्षांत काय केले? याचा हिशोबच मांडला

**पिंपरी | प्रतिनिधी**

१० वर्षे गायब असणाऱ्यांना माझ्याविरोधात बोलण्यास एकही मुद्दा नाही. सरसकट शास्तीकर माफीचे विरोधकही लाभार्थी आहेत. त्याची फलक लाऊन माहिती दिली जाईल. विरोधक खोटे बोलत आहेत. खोटेनाटे आरोप करत आहेत. पण, मी खरे बोलणार ते त्यांना लागणार आहे. जेवढे माझ्यावर आरोप करतील तेवढ्याच ताकदीने मी यांच्या विरोधात उभे राहणार आहे. वेळ येऊ द्या, जशाच तसे उत्तर दिले जाईल. सगळ्यांचा नाद करा पण आपला करायचा नाही. खतरनाक पद्धतीने पुराव्यानिशी उत्तर दिले जाईल, असा इशारा देतानाच "नागेश्वर महाराजांची शपथ... मोशी गावातील एकोपा कायम ठेवणार, असा विश्वासही भोसरी विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांनी दिला आहे.



### संतपीठ उभारल्याचे सार्थक झाले...

» निर्णय घेण्याची क्षमता असलेले नेते असल्यावर शहराचा बाहेर जाऊन निर्णय घ्यावे लागत नाही. त्याची गरज काय आहे, शहरातील समस्या शहरातील नागरिकालाच माहिती असतात. त्या दूर कशा करायच्या हे शहरातील नागरिकालाच ठरवावे लागते. त्यामुळे दहा वर्षे बाहेर जावे लागले नाही. चिखलीत संतपीठ आणले. संतपीठमधील विद्यार्थी रामकृष्ण हरी म्हणून नमस्कार करू लागली. आपला अध्यात्मिक वारसा जोपासू लागले. भोसरी मतदारसंघातील समाविष्ट भागातील पाच गावांसाठी अंद्रा, भामा असखेड धरणातून 267 एमएलडी पाणी आणले. शास्तीकराचे मानगुटीवरील भूत उतरविले. सभागृहात भांडून 460 कोटी रुपये माफ करून घेतले. यापूर्वीचा आमदार सभागृहात बोलताना कधी पाहिला का?, असा सवालही त्यांनी केला.

भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस- आरपीआयसह मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ मोशीत संवाद मेळावा घेण्यात आला. या सभेला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

( उर्वरित पान २ वर )

# गोयल गंगा युटोपियात महापालिका अधिकाऱ्यांना नो एन्ट्री

## प्रकल्प स्थळावरील कामगारांनी घेतली अधिकाऱ्यांची झडती, कामात अडथळा आणल्याप्रकरणी गोयल गंगा डेव्हलपमेंटला महापालिकेने बजावली दुसरी नोटीस



**पुणे | प्रतिनिधी**

धनमधील वादग्रस्त गंगा यूटोपिया प्रकल्पाच्या वरच्या मजल्यावर जाण्यास पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना मज्जाव केला. यामुळे मार्व्हल ओमेगा बिल्डर्ससोबत विकासकाचा सुरू असलेला वाद आणखी चिघळला आहे.

कामात अडथळा आणल्याप्रकरणी महापालिकेने गोयल गंगा डेव्हलपमेंटचे संचालक सुभाष गोयल यांना दुसरी नोटीस बजावून स्पष्टीकरण मागितले आहे. आवश्यक पूर्णता किंवा भोगवटा प्रमाणपत्राशिवाय घरखरेदीदारांना सदनिका कथित बेकायदेशीरपणे हस्तांतरित केल्याप्रकरणी महापालिकेने गोयल गंगा डेव्हलपमेंट्सला कारणे दाखवा नोटीस बजावली होती. यासंदर्भात 'सीविक मिरर'ने २२ ऑक्टोबरच्या अंकात 'गोयल गंगाला दणका' या मथळ्याखाली वृत्त देत हा प्रकार समोर आणला होता.

२२ ऑक्टोबर रोजीच नागरी अधिकाऱ्यांच्या पथकाने गंगा यूटोपिया प्रकल्पाला भेट दिली. त्यांच्या लक्षात आले की काही युनिट्स फर्निचरच्या कामासाठी तर काही युनिट्स निवासी कारणांसाठी देण्यात आल्या आहेत. आणखी तपासणी करण्यासाठी जात असताना गोयल गंगा डेव्हलपमेंटच्या कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना इतर मजल्यावर जाण्यापासून रोखले.

या घटनेची गंभीर दखल घेत महापालिका प्रशासनाने सुभाष गोयल यांना दुसरी नोटीस बजावून त्यांच्याकडून या घटनेबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. "महापालिका अधिकाऱ्यांना गोयल गंगा डेव्हलपमेंट्सच्या कर्मचाऱ्यांनी प्रवेश नाकारला होता. काही युनिटचा ताबा भोगवटा प्रमाणपत्राशिवाय दिल्याचे आढळून आले. त्यामुळे कोणतीही दुर्घटना किंवा दुर्घटना घडल्यास विकासकाला जबाबदार धरले जाईल. भोगवटा प्रमाणपत्राशिवाय युनिटच्या वापराचे स्पष्टीकरण सात दिवसांच्या आत सादर करावे," असे या नोटीशीत नमूद करण्यात आले आहे.

महसापालिकेच्या इमारत विभागातील अधिकारी रवी धवरे यांनी 'सीविक मिरर'ला सांगितले की, "आम्हाला वरच्या मजल्यावर प्रवेश नाकारण्यात आला. आम्ही सुभाष गोयल यांना नोटीस बजावली आहे आणि नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी पुढील कारवाई सुरू केली आहे."

### अशी आहे या प्रकरणाची पार्श्वभूमी

» मार्वल ओमेगा बिल्डर्स प्रा. लिमिटेडच्या विश्वजित झंवर यांनी पुणे महापालिकेकडे गोयल गंगा डेव्हलपमेंट्स एलएलपीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. यामध्ये गंगा यूटोपिया प्रकल्पातील सदनिका बेकायदेशीरपणे हस्तांतरित केल्याचा आरोप केला होता. त्यांनी १४२ सदनिका खरेदीदारांना नोटिसाही बजावल्या आणि ताबा घेण्यापूर्वी कायदेशीर परिणाम विचारात घेण्याचा इशारा दिला. झंवर यांनी जारी केलेल्या नोटीशीमध्ये म्हटले आहे की, "संपूर्ण इमारत ही गंगा यूटोपिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचा भाग आहे. सदर इमारत युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल अँड प्रमोशन रेग्युलेशनच्या (यूडीसीपीआर) नियमांचे पालन न करता बेकायदेशीरपणे बांधण्यात आली आहे. प्रकल्पाच्या विकासकाने इमारत पूर्ण झाल्याबाबत संबंधित नियोजन अधिकाऱ्यांकडून वैध इमारत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळवण्यात अपयशी ठरले आहे. ही इमारत बेकायदेशीर असल्याचा हा सर्वात मोठा पुरावा आहे. विकासकाने पूर्णत्व प्रमाणपत्र न घेता बेकायदेशीरपणे फ्लॅट खरेदीदारांना ताबा देण्याचा प्रयत्न केला. हा सर्व प्रकार रेरा कायदा, २०१६ च्या तरतुदींच्या विरोधात आहे."

### नोटीशीमध्ये नमूद केलेले निष्कर्ष असे...

» कोणतीही बिल्डिंगविषयक परवानगी मिळालेली नाही. तरीही अनधिकृत बांधकाम केले गेले आहे आणि ते वापरात आहे.
» बांधकामासाठी परवानगी मिळाली, परंतु भोगवटा प्रमाणपत्र नाही (सुरुवात प्रमाणपत्र
» भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे, परंतु बांधकाम मंजूर मर्यादेपेक्षा जास्त आहे आणि वापरात आहे
» निवासी भोगवटा प्रमाणपत्र आहे, परंतु अनिवासी वापर चालू आहे.

# पिंपरी विधानसभेत तुतारीच..

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून सुलक्षणा शिलवंत धर यांना उमेदवारी जाहीर



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभेची जागा तुतारीलाच सुटली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत धर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नुकतेच पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती दिली.

पिंपरी पिंपरी विधानसभेत तुतारी वाजणार की मशाल पेटणार? यावरून गेल्या दोन-तीन दिवसांपासून अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. अनेक अफवांचा बाजारही काहीजण पसरवत होते. मात्र या चर्चांना आता पूर्णविराम लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांकडून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून अण्णा बनसोडे विरुद्ध शरदचंद्र पवार पक्षाकडून सुलक्षणा शिलवंत अशी थेट लढत या मतदारसंघात होणार आहे.

# नागेश्वर महाराजांची शपथ... मोशीचा एकोपो कायम ठेवणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

भाजपा - शिवसेना -राष्ट्रवादी काँग्रेस- आरपीआयसह मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ मोशीत संवाद मेळावा घेण्यात आला. या सभेला परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी नगरसेविका सारिका बो-हाडे, माजी नगरेविका अश्विनी जाधव यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, 1997 ते 2017 पर्यंत समाविष्ट गावाचा वनवास होता. तो 2017 मध्ये संपला आहे. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर विकासाची गंगा आली. समाविष्ट गावांचा कायापालट झाला.

च-होलीत, मोशीकरांचे भाग्य चांगले असल्याने दोन महापौर मिळाले. पूर्वेला नितीन काळजे आणि पश्चिमेला राहुल जाधव महापौर झाले. दोघेही पूर्वी नगरसेवक होते. परंतु, स्थानिक नेतृत्वामुळे त्यांना काम करण्याची संधी मिळत नव्हती. दडपशाही खाली दबावे लागत होते. आमची कामे होत नव्हती. जनतेला न्याय देऊ शकत नव्हतो. मोठ्या झाडाखाली वाढ होत नव्हती. त्यामुळे 2014 साली विधानसभा निवडणूक अपक्ष लढलो. जनतेने मोठी साथ देत विधानसभेत पाठविले.

### विरोधकही माझ्या कामाचे लाभार्थी...

» सोसायटीधारकांवर लादलेला उपयोगकर्ता 165 कोटी रुपये शुल्क वसुलीला स्थगिती आम्हीच दिली. प्राधिकरणाच्या 97 हजार मालमत्ता फ्री होल्ड केल्या. शास्तीकराचा लाभ झालेले 80 हजार, कचरा उपयोग कर्ता शुल्क माफ केले. साडे बारा टक्के परतावा भूमिपुत्र शेतकऱ्यांना मिळवून दिला. विरोधकांचीही कामे केली. तेही लाभार्थी आहेत. गावागावात एकोपा टिकवून ठेवला, भांडणे होऊ दिले नाहीत. मोशीतील कचऱ्याचे ढीग कमी केले आणि विरोधक विचारत आहेत दहा वर्षात काय केले, असा घणाघातही आमदार लांडगे यांनी केला.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीत पेच कायम

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्हींपैकी एका मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार ठरले असताना महाविकास आघाडीत कोणता मतदारसंघ कोणत्या पक्षाकडे राहणार, हे चित्र अद्यापही स्पष्ट झाले नाही. एकही उमेदवार ठरला नसून जागांवरून राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (ठाकरे) या पक्षांमध्ये चिंचवड आणि भोसरीवरून रस्सीखेच सुरू आहे. महाविकास आघाडीतील पेच कायम असल्याने इच्छुकांमध्ये धाकधूक वाढली आहे. मुंबई, पुण्याच्या वाऱ्या सुरू आहेत. तिन्हींपैकी एका मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होऊन पाच दिवस झाले. परंतु, अद्याप महाविकास आघाडीचे उमेदवार ठरले नाहीत. दुसरीकडे महायुतीने उमेदवार जाहीर करून आघाडी घेतली आहे. महायुतीमधील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने पिंपरीतून आमदार अण्णा बनसोडे, भाजपने चिंचवडमधून शंकर जगताप आणि भोसरीतून विद्यमान आमदार महेश लांडगे यांची उमेदवारी जाहीर केली. त्यांचा प्रचार सुरू आहे. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांची उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली आहे. त्यात पिंपरी-चिंचवडमधील एकाही जागेचा समावेश नाही. काँग्रेसला शहरातील एकही मतदारसंघ मिळण्याची शक्यता नाही. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने तिन्ही मतदारसंघावर दावा केला आहे. तर, शिवसेना (ठाकरे) पक्षाचा पिंपरी आणि भोसरीवर दावा आहे.



राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष पिंपरी मतदारसंघ सोडण्यास तयार नाही. या मतदारसंघातून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांची उमेदवारी निश्चित मानली जात असताना राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार अण्णा बनसोडे यांचा पराभव करण्यासाठी आक्रमक, सक्षम चेहरा द्यावा अशी मागणी समोर आली आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) आणि आमदार बनसोडे यांच्यावर नाराज असलेल्या राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातील माजी नगरसेवकांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची गुरुवारी रात्री भेट घेतली. भाजपच्या माजी नगरसेविका, स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे यांना उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे दोघींपैकी उमेदवारी कोणाला द्यायची यावर तोडगा निघाला नाही. चिंचवडमधून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून लढण्यासाठी माजी नगरसेवक राहुल कलाटे इच्छुक आहेत. कलाटे, नाना काटे, चंद्रकांत नखाते यांनी 'तुम्ही जो उमेदवार द्याल, त्याचे काम करण्याची ग्वाही' शरद पवार यांना दिली. परंतु, अद्याप जागा कोणत्या पक्षाला सुटणार हे निश्चित झाले नाही.

भोसरीच्या जागेवरून महाविकास आघाडीत मोठी रस्सीखेच दिसून येत आहे. विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात आलेले अजित गव्हाणे, भाजपमधून शिवसेनेत (ठाकरे) आलेले रवि लांडगे हे इच्छुक आहेत. दोन्ही पक्ष जागा सोडण्यास तयार नाहीत. गव्हाणे यांनी माजी नगरसेवकांची फौज घेत जयंत पाटील यांची भेट घेतली आहे. शिवसेना (ठाकरे) भोसरीच्या जागेसाठी आग्रही आहे. त्यामुळे भोसरीवरून तिढा वाढला आहे. चिंचवड शिवसेना (ठाकरे) आणि पिंपरी, भोसरी हे मतदारसंघ राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला सोडण्यावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### पिंपरी विधानसभेत तुतारीच..

**» पिंपरी पिंपरी विधानसभेत तुतारी वाजणार की मशाल पेटणार? यावरून गेल्या दोन-तीन दिवसांपासून अनेक तर्कवितर्क लढवले जात होते. मात्र, आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांकडून माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आता पिंपरीत अण्णा बनसोडे विरुद्ध सुलक्षणा शिलवंत अशी थेट लढत या मतदारसंघात होणार आहे.**

# 'पीएमआरडीए'त अधिकाऱ्यांची दिवाळी

## अधिकाऱ्यांना खुश करण्यासाठी एजंटांची लगबग, अभियांत्रिकी, प्रशासन, अतिक्रमण विभाग ओसाड

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीएमआरडीएच्या विकास परवानगी विभागामध्ये विविध कारणांनी नागरिकांची गर्दी असते. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून गर्दी होत आहे ती अधिकाऱ्यांना खास भेटण्यासाठी. बांधकाम नोंदणी सोबतच, विविध प्रकरणासाठी अनेक बांधकाम व्यावसायिक, एजंट, आर्किटेक्ट यांची ये-जा सुरू असते. गेल्या दोन दिवसांपासून त्यांची संख्या अधिकच वाढत असून, येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या हातामध्ये जड बॅग दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी वेटिंगवर देखील थांबावे लागत आहे. त्यामुळे यंदा अधिकाऱ्यांची दिवाळी जोरात होणार असे दिसून येत आहे. एकीकडे महापालिकेने भेटवस्तू घेतल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला असून, पीएमआरडीएच्या कार्यालयात खुलेआम भेटवस्तू देण्यात येत आहेत.



प्राधिकरणाची हद्द जवळपास साडेआठशे गावांची आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड आणि पुणे या दोन्ही शहराचा देखील समावेश होतो. त्यामुळे नामवंत बांधकाम व्यावसायिक अनेक नोंदणी, प्रकल्प अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेण्यात आले. त्यामुळे आता दिवाळीच्या तोंडावर त्यांना खुश करण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांची लगबग दिसून येत आहे. या कार्यालयात आल्यानंतर प्रथम अधिकाऱ्यांना फोन होतो त्यानंतर संबंधित कर्मचारी त्यांच्याकडून ती भेटवस्तू घेऊन जातो. तर, काही अधिकाऱ्यांच्या टेबलावरती भेटवस्तू पोहोचवली जाते.

सामान्य नागरिकांना अनेकदा हेलपाटे मारून त्यांची कामे होत नाहीत. दुसरीकडे अशाप्रकारे बांधकाम व्यावसायिकांच्या अर्थपूर्ण संबंधांमुळे त्यांची कामे पटापट होतात. प्राधिकरणातील या विभागात सकाळपासून मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. इतर मात्र प्रशासन, अतिक्रमण व निर्मूलन, नियोजन, त्याचप्रमाणे अभियांत्रिक विभागात देखील शुकशुकाट होता. अनेक अधिकारी व्हीजिटच्या नावाखाली जागेवर नव्हते. तर, काही अधिकारी निवडणूक गुंतल्याने तिथपर्यंत नागरिक पोचू शकले नाहीत.

### राजकीय पदाधिकाऱ्यांचाही शुभेच्छा

**» विकास परवानगी विभाग हा महत्त्वाचा आहे. बांधकामासाठी मंजुरी आणि कागदपत्राची पडताळणी या विभागात होते. त्यामुळे प्राधिकरणात येणाऱ्या नागरिकांपैकी बहुतांश नागरिक या कार्यालयात येत असतात. त्यामुळे हा विभाग गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात चर्चेला जात आहे. बांधकाम व्यावसायिकांबरोबरच राजकीय पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणात शुभेच्छा मिळत आहेत. एका सत्ताधारी राजकीय पक्षाच्या माध्यमातून कार्यालयामध्ये अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये थेट एन्ट्री देण्यात आली.**

### विभागातील दरवाजाचे लॉक काढले

**» विकास परवानगी विभागामध्ये नागरिकांनी कधीही प्रवेश करू नये यासाठी प्रवेशद्वारापाशी लॉक लावण्यात आले आहे. केवळ कर्मचारी आणि सुरक्षा रक्षकांनाच ते खुले करण्यात येते. अन्यथा सामान्य नागरिकांना आतमध्ये सोडता येत नाही. त्यासाठी तब्बल दोन कर्मचारी येथे करण्यात असतात. मात्र दिवाळीच्या निमित्ताने सर्व नागरिकांना हा दरवाजा उघडा होता. त्याचे लॉक काढण्यात आले होते.**

# पुण्यात महाविकास आघाडीत बंडखोरीचे वारे

## महाविकास आघाडीकडून उमेदवारांच्या नावाची घोषणा : हडपसर, पर्वती, कसब्यात बंड थोपविण्यासाठी धावाधाव

**पुणे | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीकडून उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आल्यानंतर शहरात बंडखोरीचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. पर्वतीपाठोपाठ हडपसर आणि कसबा मतदारसंघात बंडखोरीचे लोण पोहोचले आहे. महाविकास आघाडीमध्ये हडपसर मतदारसंघात शिवसेना ठाकरे पक्षाने राष्ट्रवादी शरद पवार पक्षाविरोधात, पर्वतीमध्ये काँग्रेसने राष्ट्रवादी शरद पवार पक्षाविरोधात तर कसबा मतदारसंघात काँग्रेस आमदारांना स्वपक्षीय नेत्याकडूनच आव्हान देण्यात आले आहे. या मतदारसंघातील बंड थोपविण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची धावाधाव सुरू झाली आहे.



महाविकास आघाडीमध्ये शहरातील हडपसर, पर्वती, खडकवासला या मतदारसंघावरून पेच निर्माण झाला होता. शिवसेना ठाकरे पक्ष हडपसर विधानसभा मतदारसंघासाठी आग्रही होता. तर, जागा वाटपात काँग्रेसला पर्वती मतदारसंघ हवा होता. मात्र, हडपसर आणि पर्वती मतदारसंघावर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने दावा केला होता. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून शहरातील दोन मतदारसंघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये हडपसरमधून प्रशांत जगताप आणि वडगावशेरी मतदारसंघातून माजी आमदार बापूसाहेब पठारे यांचा समावेश आहे. काँग्रेसकडून विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांना कसब्यातून पुन्हा संधी देण्यात आली आहे. शिवसेना ठाकरे पक्षाने अद्यापही शहरातील एकाही उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही.

हडपसरमधून शिवसेना ठाकरे पक्षाकडून माजी आमदार महादेव बाबर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. या मतदारसंघात शिवसेना ठाकरे पक्षाची ताकद आहे, असा दावा त्यांनी केला होता. त्यासाठी बाबर यांनी ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांचीही भेट घेतली होती. मात्र, हा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने खेचल्याने नाराज झालेल्या बाबर यांनी बंडाचा झेंडा हाती घेतला आहे. बाबर यांनी शुक्रवारी कार्यकर्त्यांचा मेळावा घेतल्यानंतर बंडाची भूमिका जाहीर केली.

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात कसबा मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला आला आहे. या मतदारसंघात काँग्रेसने विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांना पुन्हा संधी दिली आहे. कसब्यातून निवडणूक लढविण्यासाठी माजी महापौर कमल व्यवहारे याही इच्छुक होत्या. मात्र, त्यांना तिकीट नाकारण्यात आले. या पार्श्वभूमीवर व्यवहारे यांनी शुक्रवारी 'स्वराज्य' पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांची भेट घेतली. स्वराज्य पक्षाकडून त्यांना कसबा मतदारसंघ देण्याची तयारीही दर्शविण्यात आली. मात्र, स्वराज्य पक्ष ऐवजी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय व्यवहारे यांनी जाहीर केला. सलग पाच वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतरही काँग्रेसने सातत्याने डावलले आहे. त्यामुळे काँग्रेसचा राजीनामा देत असून सोमवारी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

पर्वती मतदारसंघातही बंडखोरी झाली आहे. महाविकास आघाडीत हा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडे आहे. मात्र, काँग्रेसचे आबा बागुल या मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. पर्वती मतदारसंघातील उमेदवाराचे नाव राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून जाहीर झालेले नाही. मात्र, हा मतदारसंघ मिळणार नाही, हे लक्षात आल्याने बागुल यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

### महायुती, महाविकास आघाडीत अस्वस्थता

» **महाविकास आघाडीतील काँग्रेसने शहरातील केवळ कसबा मतदारसंघातील उमेदवाराची घोषणा केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने हडपसर आणि वडगावशेरीतील उमेदवारांची नावे निश्चित केली आहेत. पर्वती आणि खडकवासला मतदारसंघातील नावे उद्यापर्यंत जाहीर होण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे पक्षाकडून अद्याप एकही जागा जाहीर केलेली नाही. शिवसेना ठाकरे पक्षाला कोथरूड मतदारसंघ मिळेल, असा अंदाज आहे. महायुतीमध्ये भाजपने पुणे**

# 'नाण्यां'साठी विद्यापीठाकडून लाखोंची 'चांदी'

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चंदेरी उधळपट्टी केल्याचे समोर

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चंदेरी उधळपट्टी केल्याचे समोर आले आहे. विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेले ७५ ग्रॅमचे चांदीचे नाणे वाटण्यात येत असून, त्यावर लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत. गेल्या काही वर्षांपासून विद्यापीठाची आर्थिक स्थिती अडचणीची झाल्याचे सांगितले जात असताना चांदीच्या नाण्यांवर खर्च करण्याची गरज काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.



विद्यापीठाचे २०२३-२४ हे वर्ष अमृत महोत्सवी वर्ष होते. या वर्षभरात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, अमृत महोत्सवी वर्ष कोरडे गेल्यानंतर बहुतांश नियोजित कार्यक्रम आता ७६व्या वर्षात करण्यात येत आहेत. चांदीच्या नाण्यांचे वाटप हा त्यातीलच एक कार्यक्रम आहे. अमृत महोत्सवी वर्ष सुरू झाल्यावर चांदीचे नाणे देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यानंतर बॅग देण्याचा प्रस्तावही देण्यात आला होता. चांदीचे नाणे की बॅग, यावर बराच काळ चर्चा होऊन अखेरीस नाणे देण्यात येत आहे. विद्यापीठातील सुमारे एक हजारांहून अधिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चांदीचे नाणे देण्यात येत असल्याचे विद्यापीठातील सूत्रांनी सांगितले.

विद्यापीठातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सोन्याचे नाणे देण्याची पद्धत बऱ्याच वर्षांपासून आहे. आजवर या नाण्यांवर बराच खर्च करण्यात आला आहे. या मुद्द्यावरूनही अधिसभेत वाद झाला होता. त्यानंतर आता चांदीचे नाणे देण्यात येत आहे. एकीकडे आर्थिक अंदाजपत्रकात तूट दाखवली जात असताना दुसरीकडे चांदीचे नाणे देण्यात येत असल्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सुवर्ण आणि हीरक महोत्सवानिमित्त विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांना विद्यापीठाकडून सन्मानचिन्ह देण्यात आले होते. त्याच प्रचलित पद्धतीनुसार विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कर्मचाऱ्यांनी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार स्मृतिचिन्ह देण्यात येत आहे, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी स्पष्ट केले.

### विद्यार्थ्यांच्या समस्यांचे काय?

विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते. कमवा व शिका योजनेचे स्वरूप अतिशय मर्यादित करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हाती फारशी रक्कम पडत नाही. विद्यापीठाचा अर्थसंकल्प तुटीचा असतो. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवल्या जात नसताना विद्यापीठाकडून चांदीचे नाणे वाटणे योग्य नाही, असे विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीच्या राहुल ससाणे यांनी सांगितले.